**साक्षीदार क्र. १**
**मी याव्दारे प्रतिज्ञेपुर्वक निवेदन करतो की,**

**नाव : मोहिनी मुकूंद ठाणगे,**
**वय : ४३ वर्ष, धंदा: शेती व दुध व्यवसाय,**
**रा. साईनाथनगर, नेवासा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर**

**साक्षीदाराचा सरतपास सरकारी विधिज्ञ श्री. आर. के. शिंदे यांचेमार्फत सुरु :**

दि. ०१.०५.२०२५ रोजी मी व माझे पती मोटरसायकलवरुन मयताच्या कार्यक्रमाला जात होतो. मयत झाल्यानंतर आम्ही घरी येत असताना लोखंडी फॉलच्या पुढे व अजिंठा ढाब्याच्या समोर मागुन चार चाकी एक पांढरी कार आली. मी व माझे पती रस्त्याच्या बाजुने जात होतो. मागुन येणा-या गाडीने आम्हाला उडविले व अंदाजे पंधरा फुट आम्हाला लोटत नेले. त्यामुळे आम्ही खाली पडलो. आम्हाला गावच्या लोकांनी व जाणा-या येणा-या लोकांनी नेवासा फाटा येथील दवाखान्यात नेले. सदर अपघातामध्ये माझे दोन्ही हात मोडले असुन, त्यापैकी उजव्या हातामध्ये रॉड टाकलेला आहे. तसेच माझ्या डाव्या तळहाताचे बोट मोडलेले असुन माझा डावा कान तुटलेला आहे. तसेच माझ्या उजव्या पायाला प्लास्टीक सर्जरी केली असुन अजुन पट्टया चालु आहेत. मी व माझे पती दोघेही नेवासा फाटा येथील दवाखान्यात दोन दिवस ॲडमिट होतो व त्यानंतर आम्हाला अहमदनगर येथील मॅककेअर दवाखान्यात पाठविण्यात आले. सदर अपघातामध्ये माझ्या पतीच्या मेंदूला, डोक्याला मार लागला. तसेच त्यांच्या बरगडया तुटल्या. तसेच माझ्या पतीच्या पायामध्ये रॉड टाकला आहे. अहमदनगर येथे आम्हाला सहा ते सात दिवस उपचार केला. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनला फिर्याद दाखल केली. आता मला सदरील फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यातील मजकूर मी सांगितलेला आहे. त्यावर माझी सही आहे. सबब, फिर्यादीस **नि.१५** देण्यात येते. धडक देणा-या गाडीचा क्र. एम.एच. १७ सी. एक्स ४५८० असा होता. फिर्याद दाखल केल्यानंतर मला पुन्हा पंधरा तीन आठवडयात दवाखान्यात दाखल केले होते. माझा त्यानंतर पोलीस स्टेशनला जबाब नोंदविला नाही. आम्ही फक्त एकदा पोलीस स्टेशनला आलो होतो. धडक देणा-या गाडी चालकाचे नाव दिपक दिलीप सिंग असे होते. धडक देणा-या गाडी चालकाला ज्यावेळी त्याने धडक दिली, त्यावेळी मी पाहिले होते. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे. (साक्षीदाराने आरोपीकडे बोट दाखवून आरोपीला न्यायालयात ओळखले. )

**सरतपास पुर्ण,**
**उलटतपास आरोपीचे विधिज्ञ ॲड. श्री. बी. जे. चव्हाण यांचे मार्फत सुरु-**

मी इयत्ता चौथी शिकलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, श्रीरामपूर नेवासा हा रोड पुर्व-पश्चिम आहे. हे म्हणणे खरे आहे की, श्रीरामपूर नेवासा रोडवर रस्ता दुभाजक नाही. हे म्हणणे

खरे आहे की, श्रीरामपूर नेवासा रोडवर वाहनांची वर्दळ असते. हे म्हणणे खरे आहे की, सदर रोडवर ब-याच मोठया प्रमाणात वाहनांची ये-जा चालू असते.

आम्ही घरून सकाळी ९.०० वाजता निघालो व सकाळी ९.४५ च्या सुमारास उंदीरगाव येथे पोहचलो. आमचे घर ते उंदीरगाव हे अंतर अंदाजे २५ कि.मी ते ३० कि.मी आहे. अंत्यविधीच्या कार्यक्रमाला आम्हाला दिड तास लागला. आम्ही जाताना मोटरसायलवरून गेलो होतो. आम्ही पाहुण्यांच्या मोटरसायकल वरून गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, ज्या मोटरसायकलवरून आम्ही गेलो ती मोटरसायकल आमच्या रोजच्या वापरातली नव्हती. फिर्यादीतील मजकूर मी सांगितला होता व पोलीसांनी मी जसे सांगितले तसे लिहुन घेतले होते. मी नेवासा फाटयावर मला व माझ्या पतीला ॲडमिट केले होते, हा मजकूर पोलीसांना सांगितला नव्हता. साक्षीदार स्वत:हुन सांगते की, पोलीसांनी जेवढे विचारले तेवढेच सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, मला व माझ्या पतीला फाटयावर ॲडमिट केल्याचा मजकूर मी प्रथमत:च न्यायालयात सांगत आहे. साक्षीदार स्वत:हुन सांगते की, मी प्रथमत:च न्यायालयात आली आहे. पोलीसांनी माझा जबाब एक ते दोन वेळेस घेतला आहे. परंतु निश्चित मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, उंदीरगाव ते नेवासा येत असताना आम्ही वेगात होतो व समोरून गाडी आली व तिने हुल दिल्यामुळे माझे पती गडबडले व त्यामुळे आम्ही स्लिप होवून पडलो, त्यामुळे आम्हाला मार लागला. हे म्हणणे खरे आहे की, मी व माझ्या पतीने जिल्हा न्यायालय नेवासा येथे अपघाताची नुकसान भरपाई मिळावी म्हणुन नुकसानीचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, अपघ ाताची नुकसान भरपाई मिळावी म्हणुन मी आज रोजी साक्ष नोंदवित आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे नाव आम्हाला दुस-याकडून समजले. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला पाहिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला सर्व मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुतचा अपघात आमच्या चुकीमुळे झाला, अपघाताच्या वेळी आरोपी गाडी चालवत नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील साक्षीदार हे माझे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण, फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

PRANITA RITESH SUGAONKAR
Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2025.11.24 16:52:01 +0530

दिनांक :- २४/११/२०२५

(डॉ. पी. आर. सुगांवकर)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, नेवासा.